RNI No. MAHBIL /2009/31783

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ९३] सोमवार, जुलै २०, २०२६/ आषाढ २९, शके १९४८ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ३१२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० जुलै, २०२६.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२१७/आस्था-१(ई-१२९२१८६/१७३६०७५).— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश व संलेख यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, तहसिलदार, गट-अ व नायब तहसिलदार, गट-ब (राजपत्रित) या पदाच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

**१.** या नियमांस, निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, तहसिलदार, गट-अ व नायब तहसिलदार, गट-ब (राजपत्रित) सेवाप्रवेश नियम, २०२६ असे म्हणावे.

**२.** या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) **"नियुक्ती प्राधिकारी"** याचा अर्थ,—

(एक) मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, हे निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी व निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी, गट-अ या पदावर उमेदवाराची नियुक्ती करण्यासाठी सक्षम प्राधिकारी असतील ;

(दोन) विभागाचे प्रभारी मंत्री, हे उप जिल्हाधिकारी, तहसिलदार, गट-अ व नायब तहसिलदार, गट-ब (राजपत्रित) या पदावर उमेदवाराची नियुक्ती करण्यासाठी सक्षम प्राधिकारी असतील ;

असा आहे ;

(ख) **"पदवी"** याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता, असा आहे;

(ग) **"विभाग"** याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा महसूल विभाग, असा आहे;

(घ) **"आयोग"** याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा आहे;

(ड) **"पदोन्नतीची पात्रता"** याचा अर्थ, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी काढलेले नियम, शासन निर्णय किंवा आदेश यांमध्ये पदोन्नतीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीनुसार असलेली पदोन्नतीची पात्रता, असा आहे;

(च) **"शासन"** याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

३. "निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी,गट-अ" या पदावरील नियुक्ती,—

(क) "अपर जिल्हाधिकारी, गट-अ" हे पद धारण करणाऱ्या तसेच उक्त पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा झालेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने करण्यात येईल;

४. "अपर जिल्हाधिकारी, गट-अ" या पदावरील नियुक्ती,-

(क) "निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी, गट-अ" हे पद धारण करणाऱ्या तसेच उक्त पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा झालेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने करण्यात येईल;

५. "निवडश्रेणी उप जिल्हाधिकारी, गट-अ" या पदावरील नियुक्ती,—

(क) "उप जिल्हाधिकारी, गट-अ" हे पद धारण करणाऱ्या तसेच उक्त पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा झालेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने करण्यात येईल; किंवा

(ख) पदोन्नतीने योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सामान्य प्रशासन विभागाने, त्याबाबतीत, वेळोवेळी, केलेल्या अटी व शर्तींना अनुसरून, शासनाचा मंत्रालयीन अर्हताप्राप्त अवर सचिव हे पद धारण करणाऱ्या अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने करण्यात येईल.

६. "उप जिल्हाधिकारी, गट-अ" या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) "तहसिलदार, गट-अ" हे पद धारण करणाऱ्या तसेच उक्त पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा झालेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने करण्यात येईल; किंवा

(ख) आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे, आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे, पुढील निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून करण्यात येईलः-

**(एक) वयोमर्यादा,—**

(एक) किमान वयोमर्यादा.— उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अठरा वर्षांपेक्षा कमी वयाचा नसावा.

(दोन) कमाल वयोमर्यादा.— उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी वय ३८ वर्षांपेक्षा अधिक नसावे आणि राखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी वय ४३ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

**(दोन) किमान शैक्षणिक अर्हता.—** पदवी धारण केलेली आहे, असा उमेदवार;

(ग) पदोन्नतीने किंवा सरळसेवेने नियुक्ती करताना योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास, सामान्य प्रशासन विभागाने, त्याबाबतीत, वेळोवेळी, केलेल्या अटी व शर्तींना अनुसरून, शासनाचा मंत्रालयीन अर्हताप्राप्त अवर सचिव हे पद धारण करणाऱ्या अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने करण्यात येईल.

७. **"तहसिलदार, गट-अ"** या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) "नायब तहसिलदार, गट-ब (राजपत्रित)" हे पद धारण करणाऱ्या तसेच उक्त पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा झालेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने करण्यात येईल;

(ख) आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे, आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे, पुढील निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून करण्यात येईल:-

**(एक) वयोमर्यादा,-**

(एक) किमान वयोमर्यादा.— उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अठरा वर्षांपेक्षा कमी वयाचा नसावा.

(दोन) कमाल वयोमर्यादा.— उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी वय ३८ वर्षांपेक्षा अधिक नसावे आणि राखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी वय ४३ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

**(दोन) किमान शैक्षणिक अर्हता,-** पदवी धारण केलेली आहे, असा उमेदवार;

८. "नायब तहसिलदार, गट-ब (राजपत्रित)" या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) "सहायक महसूल अधिकारी, गट-क" आणि "मंडळ अधिकारी, गट-क" हे पद धारण करणाऱ्या तसेच उक्त पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा झालेल्या व्यक्तींमधून, ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने करण्यात येईल; किंवा

**स्पष्टीकरण.—** सहायक महसूल अधिकारी, गट-क किंवा मंडळ अधिकारी, गट-क यांची ज्येष्ठता सूची, त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकाआधारे संबंधित महसुली विभागस्तरावर तयार करण्यात येईल.

समजा, उक्त दोन्ही पदे धारण करणाऱ्या दोन किंवा अधिक अधिकाऱ्यांची नियुक्ती एकाच दिवशी झालेली असल्यास, त्यांची ज्येष्ठता त्यांच्या निम्न पदावरील नियुक्तीच्या दिनांकानुसार निश्चित करण्यात येईल.

तसेच निम्न पदावरील नियुक्तीचा दिनांकही समान असल्यास, ज्येष्ठता निश्चित करताना वयाने ज्येष्ठ अधिकाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.

(ख) आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे, आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे, पुढील निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून करण्यात येईल :—

**(एक) वयोमर्यादा,—**

(एक) किमान वयोमर्यादा.— उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अठरा वर्षांपेक्षा कमी नसावे.

(दोन) कमाल वयोमर्यादा.— उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी वय ३८ वर्षांपेक्षा अधिक नसावे आणि राखीव प्रवर्गातील व्यक्तींसाठी वय ४३ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

**(दोन) किमान शैक्षणिक अर्हता,-** पदवी धारण केलेली आहे, असा उमेदवार;

९. नियम ३ ते ८ मध्ये नमूद केलेल्या पदांवरील नियुक्ती ही, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्यात येईल.

१०. (क) नियम ६ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनाने अनुक्रमे ६०:४० या प्रमाणात नियुक्ती करण्यात येईल.

(ख) नियम ७ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनाने अनुक्रमे ६०:४० या प्रमाणात नियुक्ती करण्यात येईल.

(ग) नियम ८ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने व नामनिर्देशनाने अनुक्रमे ८०:२० या प्रमाणात नियुक्ती करण्यात येईल :

परंतु, सहायक महसूल अधिकारी, गट-क आणि मंडळ अधिकारी, गट-क या संवर्गातील व्यक्तींना पदोन्नती देण्याचे प्रमाण, प्रत्येक विभागासाठी प्रत्येक संवर्गाची संख्या विचारात घेऊन शासनाकडून सर्वसाधारण किंवा विशेष आदेश अथवा शासन निर्णयाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

**११.** नियम ६, ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाने नियुक्ती झालेल्या आणि एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) या अंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारास, त्याची सेवाज्येष्ठता संबंधातील बाबी, विभागीय परीक्षा, व इतर सेवा संबंधित बाबी यांचे, सामान्य प्रशासन विभागाद्वारे, वेळोवेळी, काढलेल्या नियम व विनियम यांनुसार विनियमन करण्यात येईल. तथापि, जर उमेदवार हा विहित केलेल्या कालमर्यादेत उक्त प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) समाधानकारकरीत्या पूर्ण करण्यात अपयशी झाल्याचे आढळून आला तर, त्याची सेवा समाप्त केली जाण्यास पात्र असेल.

**१२.** (क) नियम ३, ४, ५, ६, ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी अगोदरच हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, त्याबाबतीत, शासनाने, वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील.

(ख) नियम ६, ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, अगोदरच हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, त्याबाबतीत, शासनाने, वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील. ती व्यक्ती, या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदांवरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

**१३.** (क) नियम ३, ४, ५, ६, ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी अगोदरच संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करीत नसेल किंवा असे प्रमाणपत्र धारण करण्यापासून तिला सूट देण्यात आली नसेल तर, ती, याबाबतीत शासनाने, वेळोवेळी, केलेल्या नियमांनुसार किंवा आदेशांनुसार विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करील.

(ख) नियम ६, ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त करावयाच्या व्यक्तीने, तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती, याबाबतीत, शासनाने, वेळोवेळी, केलेले नियम किंवा काढलेले आदेश यांद्वारे विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत धारण करील. ती व्यक्ती, ते प्रमाणपत्र धारण करीपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

**१४.** (क) नियम ६,७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ याच्या तरतुदींनुसार किंवा याबाबत, शासनाने, वेळोवेळी, केलेले अन्य कोणतेही नियम, काढलेले आदेश किंवा कोणतेही संलेख यांनुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करील, अन्यथा अशी व्यक्ती उक्त पदावर नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

(ख) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करण्याच्या दिनांकास, दोनपेक्षा अधिक अपत्ये असणारी व्यक्ती, शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र असेल.

(ग) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर तिला, नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिद्ध झाले तर, ती व्यक्ती, शासकीय सेवेतील उक्त पदावर कायम राहण्यास अपात्र असेल.

**१५.** नियम ३, ४, ५, ६, ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तींची ज्येष्ठता यादी राज्यस्तरावर ठेवली जाणार असल्याने, सदर पदांवर नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.

**१६.** कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीआधी किंवा नियुक्तीनंतर, शासनाने, वेळोवेळी, निर्गमित केलेले कोणतेही नियम किंवा घेतलेले निर्णय यांमध्ये, शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास देखील लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास खारगे,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## REVENUE DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 20th July, 2026.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. Misc. 2024/C.R.217/EST-01(E-1292186/1736075).— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all the existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Selection Grade Additional Collector, Additional Collector, Selection Grade Deputy Collector, Deputy Collector, Tahsildar Group-A and Naib Tahsildar, Group-B (Gazetted) under the administrative control of the Revenue Department of the Government of Maharashtra, namely :—

**1.** These rules may be called the Selection Grade Additional Collector, Additional Collector, Selection Grade Deputy Collector, Deputy Collector, Tahsildar, Group-A and Naib Tahsildar, Group-B (Gazetted) Recruitment Rules, 2026.

**2.** In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Appointing Authority" means,—

(*i*) the Chief Minister, Maharashtra State, shall be the competent authority to appoint a candidate to the posts of Selection Grade Additional Collector, Additional Collector, Selection Grade Deputy Collector, Group-A; and

(*ii*) the Minister-in-charge of the Department shall be the competent authority to appoint a candidate to the posts of Deputy Collector, Tahsildar, Group-A and Naib Tahsildar, Group- B (Gazetted);

(*b*) "Degree" means degree of any discipline of a Statuary University or any other qualification declared by the Government to be equivalent thereto;

(*c*) "Department" means the Revenue Department of the Government of Maharashtra;

(*d*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission;

(*e*) "Eligibility for promotion" means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in Rules, Resolutions or Order issued by the General Administration Department of the Government, from time to time;

(*f*) "Government" means the Government of Maharashtra.

**3.** Appointment to the post of the Selection Grade Additional Collector, Group-A shall be made,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Additional Collector, Group-A and having not less than three years regular and continuous service on the said post;

**4.** Appointment to the post of the Additional Collector, Group-A shall be made,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Selection Grade Deputy Collector, Group-A and having not less than three years regular and continuous service on the said post;

**5.** Appointment to the post of the Selection Grade Deputy Collector, Group-A shall be made,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Deputy Collector, Group-A and having not less than three years regular and continuous service on the said post; or

(*b*) by deputation of an eligible officer holding the post of Under Secretary to Government in the Mantralaya Secretariat, in accordance with the terms and conditions issued by the General Administration Department in that behalf, from time to time, if suitable candidates by promotion is not available.

**6.** Appointment to the post of Deputy Collector, Group-A shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Tahsildar, Group-A and having not less than three years regular and continuous service on the said post; or

(*b*) by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of the result of the Competitive Examination conducted therefor, who fulfils the following criteria, namely :—

(I) *Age Limit.*—

(*i*) *Lower Age Limit.*— Not less than eighteen years of age as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post.

(*ii*) *Upper Age Limit.*— Not more than thirty-eight years of age for the persons not belonging to reserved categories and not more than forty-three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post.

(*II*) *Minimum Educational Qualification.*— A candidate possess a degree;

(*c*) by deputation of an eligible officer holding the post of Under Secretary to Government in the Mantralaya Secretariat, in accordance with the terms and conditions issued by the General Administration Department in that behalf, from time to time, if suitable candidates by promotion or nomination is not available.

**7.** Appointment to the post of Tahsildar, Group-A shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Naib Tahsildar, Group-B (Gazetted) and having not less than three years regular and continuous service on the said post; or

(*b*) by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of the result of the Competitive Examination conducted therefor, who fulfils the following criteria, namely :—

(*I*) *Age Limit.*—

(*i*) *Lower Age Limit.*— Not less than eighteen years of age as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post.

(*ii*) *Upper Age Limit.*— Not more than thirty-eight years of age for the persons not belonging to reserved categories and not more than forty-three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post.

(*II*) *Minimum Educational Qualification.*— A candidate possess a degree;

**8.** Appointment to the post of Naib Tahsildar, Group-B (Gazetted) shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the posts of Assistant Revenue Officer, Group-C and Circle Officer, Group-C and having not less than three years regular and continuous service on the said posts; or

*Explanation.*— The seniority list of the posts of Assistant Revenue Officer, Group-C and Circle Officer, Group-C shall be prepared at the respective revenue division based on their date of appointment.

In case two or more officers holding either of the said posts are appointed on the same date, their seniority shall be determined according to the date of appointment to their feeder post.

Further, if the date of appointment to the feeder post is also the same, preference shall be given to the officer who is senior in age while determining seniority,

(*b*) by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of the result of the Competitive Examination conducted therefor, who fulfils the following criteria, namely :—

(*I*) *Age Limit,*—

(*i*) *Lower Age Limit.*— Not less than eighteen years of age as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post.

(*ii*) *Upper Age Limit.*— Not more than thirty-eight years of age for the persons not belonging to reserved categories and not more than forty-three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post.

(*II*) *Minimum Educational Qualification,*— A candidate possess a degree;

**9.** Appointment to the posts mentioned in rules 3 to 8 shall be made with the approval of the Appointing Authority.

**10.** (*a*) Appointment to the post mentioned in rule 6 by promotion and nomination shall be made in the ratio of 60:40, respectively.

(*b*) Appointment to the post mentioned in rule 7 by promotion and nomination shall be made in the ratio of 60:40, respectively.

(*c*) Appointment to the post mentioned in rule 8 by promotion and nomination shall be made in the ratio of 80:20, respectively :

Provided that, the proportion in which persons from the cadre of Assistant Revenue Officer, Group-C and Circle Officer, Group-C are to be promoted shall be as may be specified by the Government by the general or specific order or Government Resolution for each Division after considering the strength of each cadre.

**11.** A person appointed to the posts mentioned in rules 6, 7 and 8 by nomination undergoing training under Combined Probationary Training Programme (CPTP), the service matters pertaining to their seniority, departmental examination and other service matters shall be regulated by rules and regulations prescribed by the General Administration Department, from time to time. However, if a person fails to complete the said training programme (CPTP) satisfactorily, within the prescribed period, his services shall be liable to be terminated.

**12.** (*a*) A person to be appointed to the posts mentioned in rules 3, 4, 5, 6, 7 and 8 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examination as per the rules made in this behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations, before getting promoted to the said post.

(*b*) A person appointed to the posts mentioned in rules 6, 7 and 8 by nomination shall pass the Marathi and Hindi languages examination as per the rules made in this behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passes those examinations.

**13.** (*a*) A person to be appointed to the posts mentioned in rules 3, 4 5, 6, 7 and 8 by promotion shall possess a Certificate of Computer Operations prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he already possess such Certificate or has been exempted therefrom, before getting promoted to the said post.

(*b*) A person appointed to the posts mentioned in rules 6, 7 and 8 by nomination shall possess a Certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he already possessed or has been exempted from possessing such Certificate, otherwise, he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possesses the same.

**14.** (*a*) A person recommended for appointment by nomination to the posts mentioned in rules 6, 7 and 8 shall submit a declaration of Small Family as per the provision of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(*b*) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family shall be disqualified for the appointment in Government Service.

(*c*) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in the Government service.

**15.** Any person appointed to the posts mentioned in rules 3, 4, 5, 6, 7 and 8 shall be liable to the transferred anywhere in the State of Maharashtra, as a seniority list of the said posts is maintained at State level.

**16.** The terms and conditions specified by the Government, in any rule, or resolution issued by Government from time to time, before or subsequent to the appointment of any Government Servant shall also be applicable to the concerned Government Servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIKAS KHARAGE,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.